# प्रभुतरुण

| वर्ष ५४ | अंक ४ | मुंबई | १६ डिसेंबर, २०२० | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**    *कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## सुंदर लेणी

—सुहासिनी कीर्तिकर

सध्या आता थंडीचा मौसम आहे. निसर्गचक्र चालूच. (म्हणजे ते 'चालू' नाही हं. हा ऽ हा ऽऽ हा ऽऽऽ हा!) चक्र म्हटले की ते फिरतच असणार. त्या फिरण्यानुसार आपले दैनंदिन जीवनही बदलणार. सध्याच्या काळात ते जरा जास्तच प्रमाणात बदलावे लागले. आपला 'प्रभुतरुण'ही बदलला. मधले दोन अंक त्याने 'पीडीएफ' प्रत काढून वाचकांना भेटणे चालू ठेवले. भरदार असा दिवाळी अंक जोडअंक म्हणून सादर झाला. एरवी तो वाढदिवस कधी कधी विसरतो. पण ऑनलाईन गाण्याचा कार्यक्रम करून तो वाढला! म्हणजे यावर्षी त्याला तीन डहाळ्या फुटल्या. पीडीएफ, जोडअंक आणि ऑनलाईन कार्यक्रम. तो असाच वाढत रहाणार आहे तुम्हा सर्वांच्या सहकार्याने, आशीर्वादाने. निसर्गचक्रानुसार त्यालाही नवी पालवी फुटते आहे. ही 'नवी पालवी' पुढील अंकापासून सुरू होणाऱ्या नवीन सदरांतूनही तुम्हाला पालवणार आहेच. 'प्राप्त काल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा. निजनामे त्यावरती नोंदा...' हा केशवसुतांचा कानमंत्र घेऊन 'प्रभुतरुण' प्राप्त काळावर आपले लेणे खोदतो आहे.

ही 'निजनामे' रसिकहो, तुमचीच असणार आहेत पर्यायाने. तर भेटूया पुढील वर्षी. निरोगी वातावरणात, सुदृढ मनाने आणि स्वच्छ जाणीवेने! या वर्षीचे जे जे वाईट, घातक ते ते २०२०च्या उदरात गडप होऊ द्या. नववर्षाच्या तुम्हा सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!

*विस्तारित संपादकीय*

## A Revolutionary Change!

- Sanjana Kothare

The Euphoria at the Prabhu Tarun Digital camp was highly addictive. We were finally laying the foundation stone of a new beginning. The crucial question as to what is the future of Prabhu Tarun had been hounding us for years. As we inch closer to the Centenary of this esteemed newsletter, we felt it was time we took the plunge. Prabhu Tarun completes 100 years in 2023!!!

As a quote reads, "The secret of change is to focus all of your energy not on fighting the old, but on building the new." We are proud to bring a revolutionary change in the functioning of our Esteemed Newsletter by catering globally 'digitally', to the Pathare Prabhus all over the world.

Our Late Ex-Editors Mr. Suhas Kothare and Mr. Vihang Nayak had put in enormous amount of efforts to keep the community together by organizing various cultural events and other activities. Our Newsletter boasts of high literary value due to the contribution of Mr. Suhas Kothare, Mr. Vihang Nayak, our current Editor Prof. Smt. Suhasini Kirtikar besides several eminent writers of our community. However the aim of this institution has always been to encourage amateur talent by providing a platform for their talent in terms of performing arts besides preserving the culture and traditions of our community by bringing the entire community together on one platform. Although the essence of Prabhu Tarun has not changed, our approach had to change with the changing times.

We, at Prabhu Tarun still continue to have the same focus and vision as that of our Ex-Editors and we strive to keep the community bonded and united besides conserving our culture and traditions for the future generation. Change, is the only constant in Life and with change comes evolution. As we evolve with time we take a step ahead with the help of technology.

Technology, a boon or a curse, has been a controversial subject however 2020 has proved that Technology if used wisely can indeed be a boon. Thanks to technology, we have been able to connect and meet our family members and friends virtually atleast despite of the social distancing. Change is inevitable and we need to change with the changing times. We take this opportunity to announce a major change in the functioning of our age old newsletter Prabhu Tarun as we adapt ourselves and adhere to the need of the hour.

Prabhu Tarun had launched its Website in August 2009. It has been more than a decade and a lot of changes have taken place since then. We are extremely happy to announce that as a part of our Centenary celebration we are Restructuring our Website which will serve as a 'Data Base' for our community members. We have introduced a lot of sections and this will take some months for update and completion however we intend to have a relaunch of the website on the auspicious occasion of Gudi Padwa in the coming year.

We would like to make an appeal to you all as we will need your support and contribution from your end to preserve our community data for Generations to come. This website will have contents which will be of the Pathare Prabhus, by the Pathare Prabhus however it will not be restricted only 'for' the Pathare Prabhus. This website will have sections which will be useful and accessible even for non Pathare Prabhus.

Today's generation might not feel the necessity or importance of having a data of our community or rather know anything about our community. But you never know their children might want to search for their roots and would not know where to look for. So here we are trying to build up a data base for our coming generations where they will find everything they want to know about Pathare Prabhus under one roof.

The details of the contents of the website will be shared on our Prabhu Tarun Facebook group as well as on our Instagram account and we request you all to watch out for future updates on Facebook as well as Instagram.

We have tried our level best to continuing serving the community and setting up a data base for the benefit of our community members however maintaining the website for years to come is a responsibility of every Pathare Prabhu as we can create a website, upload the data however kindly keep in mind that preserving the data forever will come for a cost which is the responsibility of every Pathare Prabhu.

Alone we can do so little, together we can do so much. The strength of the team is each individual member and the strength of each member, is the team. We have a team of Pathare Prabhus who have a common vision and we are striving hard to achieve our goals for the benefit of our community.

Introducing our PRABHU TARUN GOES DIGITAL TEAM.

The team is led by our Trustee Mr. Pranav Desai and Sanjana Kothare.

Our technical team because of whom you all are able to participate and view our 1st Online Event and will be viewing the forthcoming Online attractions is led by Mr. Sunil Pawar who has been managing our website since its inception in 2009. Sunil is assisted by his wife Dnyanada Pradhan Pawar. Despite of the time difference as they are based in the US and we

(Cont. on page 2 col.1)

विस्तारित संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

in India, Sunil and Dnyanada both have been available for us whenever we need them and we owe the success of our 1st Online Karaoke event to this wonderfully talented couple.

Monica Rane Iyer who is assisting Sunil and Dnyanda on the technical aspect is the daughter of Pandit Sujan Rane and Neelima Rane and has a long term association with Prabhu Tarun as Pandit Sujan Rane has been a part of the Prabhu Tarun family since the term of the then editor Shri. Suhas Kothare and continues to shower his blessing upon us. ***Monica Rane Iyer and Mr.Ravi Iyer have generously donated 200$ for Prabhu Tarun out of which she has been kind enough to sponsor our Zoom account for 2021. Thank you so much Monica and Ravi for this kind gesture.***

Akshay Sudeep Kothare is our Technical help back in India along with Sagar Rane Devrukhkar who has ancestral connections with Prabhu Tarun as Sagar happens to be the grandson of the once Chairman of Prabhu Tarun board Mr. Shrikar Rane who was also closely associated with Mr Suhas Kothare and has worked during his term for Prabhu Tarun.

Mayura Nayak handles our Marketing and Advertisements. Pranav Desai takes care of the Finance. Sanjana Kothare alongwith Neha Wagh (Desai) handles the Social media.

The rest of our team includes Anushry Kothare, the grand daughter of Mrs.Vidya Vijayakar who has been an active member of the Prabhu Tarun family and closely associated with the then editor Mr. Suhas Kothare.

Janhavi Kirtikar's connection with Prabhu Tarun goes right from its inception as Janhavi's great grandfather Shivshankar Talpade happens to be one of the founder members of this esteemed newsletter Prabhu Tarun. Janhavi has also been handling the change of addresses for the newsletter publication since years.

We also have Mihika Navalkar and Shivani Devrukhkar on our Team.

We bring to you a lot of content on our Website which is going to be handled by this 13 member team which will be revealed gradually through our social media handles. We look forward to your support in providing the necessary content for our website as and when required hence do watch out for that space on Facebook and Instagram. Looking forward to a new Digital Beginning for Prabhu Tarun and our entire Pathare Prabhu clan.

⁕

# The Launch of the Digital Platform

**- Sanjana Kothare**

As an inaugural function to launch Prabhu Tarun goes Digital, we kick started our Centenary celebrations of Prabhu Tarun during the auspicious Diwali Festival wherein the entire Pathare Prabhu family gathered for a grand celebration. As soon as we announced the Karaoke event and opened registrations for the same, we were flooded with entries but unfortunately we were compelled to stop accepting any more entries as we had to consider the length of the show. However the entrants were assured that they would be on the waiting list for the next season. The eligibility to any Prabhu Tarun event being 1) Pathare Prabhu by Birth 2) Pathare Prabhu by lineage upto the grandparents wherein any one of the grandparent has to be a Pathare Prabhu by birth and 3) Having married a Pathare Prabhu.

We at the Prabhu Tarun Goes Digital camp were all excited, elated, thrilled and anxious to know if our 1st Online event would be accepted by the community members or no. Will we face any technical glitches? Will the event be viewed by all? Will we be accepted Digitally? A plethora of questions was flooding our thoughts and we were anxiously awaiting for our event to begin.

Our 1st Online Karaoke event was announced on social media and marketed over the popular social media platform viz. Facebook. The participants were asked to video record a few lines of any song and their videos were posted on our Prabhu Tarun You Tube Channel as teasers for the event. The medium of streaming for our event was through our own You Tube Channel where the entire programme was streamed LIVE and the link was shared on our Prabhu Tarun Facebook Group. Everybody was requested to subscribe to our channel inorder to view our event and all the future Prabhu Tarun events.

Finally the D-day dawned with some shocking news as our Original Emcee for the evening, Sameera Navalkar announced her personal difficulty in hosting our event due to a demise in her family. Well that was unfortunate and we needed a back up for Sameera. Had to take some urgent decisions and following one brief call, the decision was made as Monica Rane Iyer accepted to step in and anchor our show. Sameera who had worked hard on the script for several days was generous enough to hand over her notes to Monica however the US based Monica barely had a couple of hours to prepare her script for our event which was to start as early as 5:30 a.m. for her in US.

Despite of all the odds, we were all set at 7 p.m. IST to host our 1st Online Karaoke Event which was the inaugural event for Prabhu Tarun's Centenary celebrations. The event was opened by Sanjana Kothare who gave a brief introduction to the event and invited our editor Prof. Smt. Suhasini Kirtikar to say a few words and inaugurate the celebrations. The opening speech was followed by an address by our Senior most Trustee Mr.Bansi Dhurandhar.

Thereafter our graceful and ever-smiling Monica Rane Iyer took charge and hosted the show which was so enthralling that we still continue to receive rave reviews about our hostess. Despite of the short notice, Monica took over effortlessly as the emcee and conducted the entire event crisply. We had 35 participants who entertained us for a good 3.5 hours however the master behind conducting the event smoothly was our techie Sunil Pawar who managed the flow of the event seamlessly with the able support of his wife Dnyanada Pradhan Pawar.

Throughout the event the rest of our team was at work handling the You Tube and Facebook posts, inviting your 'Selfies with your family watching the show" and posting them on our Facebook page. It was extremely satisfying to watch grandparents to parents, uncles, aunts and children sitting together watching the event 'Live'. There was a lot of excitement among the viewers as they sportingly shared their family pics with us while the songs were being played and served our vision of having a family get-together with the entire Pathare Prabhu clan. Mid way through the event, Sanjana Kothare gave a brief introduction of how Prabhu Tarun Goes Digital and introduced the rest of her team members and also the Prabhu Tarun trustees.

Although we were all apart, the connect that we all shared through the Online platform was magical. As per our official records, the You Tube subscribers have reached 340 and it was most satisfying to know that more than 300 Pathare Prabhu families all over the world were watching our 1st Online event 'LIVE' and currently our event boasts of having over 6k views.

The Diwali event came to an end with fireworks in the form of your generous messages, overwhelming feedback on our Facebook group and numerous phone calls. We at the Prabhu Tarun camp are over whelmed to receive so much of love, blessings and accolades from all of you and we are grateful to you to have accepted this Digital platform as the future of Prabhu Tarun.

⁕

## अभिनंदन

✶ रोटरी क्लबतर्फे विक्रमगड तालुक्यातील अंगणवाडीच्या मुलांना पूरक पोषणआहाराची चारशे पन्नास पाकिटे माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्री. बन्सी धुरंधर यांच्या हस्ते देण्यात आली. हा उपकर्म वर्षभर चालणार आहे. 'तेथे कर माझे जुळती!'

✶ सौ. मोनिका राणे अय्यर यांना काँटेम्परी आर्ट गॅलरीचे ऑनलाईन अवॉर्ड मिळाले.

✶ पा. प्र. महिला समाज आणि पा. प्र. सोशल समाज या संस्थांनी ऑनलाईन दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. पा. प्र. चॅरिटीजच्या वार्षिक अहवालाची 'पीडीएफ' प्राप्त झाली. नेहमीप्रमाणेच हा अहवाल परिपूर्ण आहे.

✶ प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी विदर्भ साहित्य संघातर्फे झालेल्या ऑनलाईन चर्चासत्रात 'नव्वदोत्तरी महानगरीय मराठी कथा' या विषयावर पेपर सादर केला. को. म. साहित्य परिषदेतर्फे झालेल्या ऑनलाईन कविता वाचनाच्या कार्यक्रमात स्वत:ची कविता सादर केली. अमराठी भाषकांकरिता असणाऱ्या मराठी वर्गांचे ऑनलाईन भाषावर्गात त्यांनी स्थित्यंतर केले. त्यात नेहमीप्रमाणेच शिक्षिका म्हणून सौ. मीनाक्षी जयकर यांचे योगदान असणार आहे. या ऑनलाईन भाषावर्गाची संचालिका म्हणून 'मिड डे' मध्ये त्यांची मुलाखत त्यांच्या छायाचित्रासह प्रसिद्ध झाली. पाच दिवाळी अंकात त्यांचे साहित्य प्रकाशित झाले. महाराष्ट्र शासनाच्या उच्च तंत्रशिक्षण विभागातील 'लोकसाहित्य समिती'त त्यांची सदस्य म्हणून नेमणूक झाली. त्यांची प्रस्तावना असलेल्या 'आषाढी'वर म.टा. मध्ये परीक्षण आले. त्यात प्रस्तावनेची वाखाणणी आहे.

✶ 'ओव्हर द टॉप' ओटीटी प्लॅटफॉर्मवर श्रेयस तळपदे यांच्या पुढाकाराने 'नाटक आपल्या घरी' हा प्रकल्प सुरू झाला.

✶ 'महाराष्ट्र टाइम्स'च्या 'बहुतांची अंतरे' मध्ये शॉन केनरीवर मृदुला प्रभुराम जोशी यांची प्रतिक्रिया प्रसिद्ध झाली.

✶ मराठी संस्कृती मंडळातर्फे झालेल्या ऑनलाईन गाण्याच्या कार्यक्रमात सौ. अचला सुभाष देसाई यांनी गीत सादर केले.

नाळ

# कर्म

-हेमंत विनायकराव तळपदे

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफल हेतुभूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणी।।

भगवद्‌गीतेतल्या दुसऱ्या अध्यायातील ४७वा हा श्लोक आपणास बराच काही बोध देतो. यात भगवान श्रीकृष्ण आपल्या कर्माचे महत्त्व सांगताना या कर्माचे पालन करून त्यापासून अलिप्तही राहण्याचा सल्ला देतात. कर्मफलाची अपेक्षा मानवाने ठेवू नये इतका सहज मतितार्थ. पण आपण मात्र बऱ्याचदा येथेच चुकतो. कर्म केल्यावर ह्या कर्माची महती लोकांना पटवून देण्यातच आपण बरीचशी शक्ती वाया घालवितो.

असे म्हणतात की, आपला जन्म आपल्या हातात नाही. मग कोणी मानव शिक्षक होतो; तर कोणी पोलीस. पण परिस्थिती आणि संगत बऱ्याचदा त्या मानवाला ते विशिष्ट कर्म करण्यास भाग पाडते. काही भविष्यावर विश्वास ठेवणारे लोक ही कर्मे आपल्या ग्रहांच्या प्रभावामुळे करावीच लागतात हे मानतात. तर काही श्रद्धाळू ही कर्मे देवच आपल्या हातून घडवून आणतो असे मानतात. खरे नक्की काय याचा बोध आजही कोणाला झालेला नाही. म्हणून यामध्ये जास्त गढून न जाता आपण आपल्या कर्माचे उचित मूल्यमापन स्वत: करणे अधिक चांगले असे म्हणावेसे वाटते.

काहीजण तर या कर्माची सांगड आपल्या गतजन्माच्या पापपुण्याशीही लावतात. या कर्माचे शुभअशुभ परिणाम आपल्याला याच जन्मात भोगावे लागतात असेही मानतात. काहीही असो, मी तर म्हणेन; या सर्व जंजाळात गुरफटून न जाता आपण स्वत: स्थितप्रज्ञ राहून आपल्या कर्माचे उचित मूल्यमापन करणे जास्त संयुक्तिक ठरेल.

या जगात जन्म घेतल्यावर माझे इप्सित कर्म काय हे कदाचित आपल्याला माहीत नसते. पण कालओघात आपण काही कर्मे पार पाडतो. मग ते सत्कर्म असो वा दु:कर्म, मी तर असे म्हणेन की आपण आपल्या एखाद्या कर्माचे वाईट परिणाम जाणवल्यावर त्याची जबाबदारी अथवा कारणभाव इतरांवर लादतो. पण खरे पाहता त्या दु:कर्माचा मुख्य कारक आपणच असतो.

आता माझे नियतकर्म काय; याचा मी विचार करतो तेव्हा मला काही गोष्टी जाणवू लागतात. मी एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलो. शिक्षण पार पडल्यावर एका खाजगी कंपनीत ३ वर्षे नोकरीही केली. पगारही त्या वेळेप्रमाणे चांगलाच होता. पण काहीही झाले तरी त्या नोकरीत मन रमत नव्हते. माझ्यातला हाडाचा शिक्षक माझ्या मनाला बेचैन करत होता. मग एक वेळ अशी आली की, मी पूर्णवेळ शिक्षक होण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार 'हेमंत क्लासेस' सुरू केले. तेव्हापासून आजतागायत मी हजारो विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे कर्म केले. यात कोणताही अहंकार नाही. मी तर असेच मानतो की, हे सर्व नियतीकर्मच आहे. यात काही चुकाही होतात. पण त्यापासून सावरणे व पुन्हा चांगल्या कर्माची आस ठेवणे इतके जरी आपल्याला उमजले तरी आपला जन्म सार्थकी लागला असे म्हणावे लागेल. या कर्माची फलिते मात्र खूप आनंददायी असतात. माझा एखादा विद्यार्थी बऱ्याच वर्षांनंतर 'सर, आपण कसे आहात? ओळखलंत का? मी अमुक अमुक संस्थेत मोठ्या पदावर आहे. संसारात स्थिरस्थावर आहे.' असे सांगतो तेव्हा माझ्या या छोट्याशा कर्माचे फलित किती उदात्त आहे याची प्रचिती येते.

माझेच नव्हे तर; या समाजात अनेक बंधूभगिनी आपापली कर्मे चांगल्याप्रकारे निभावतात. मग ब्राह्मण पूजाअर्चा करतात, डॉक्टर, नर्सेस रोग्यांची शुश्रुषा करतात. इतकेच काय; तर महानगरपालिकेचे चतुर्थ श्रेणी कर्मचारी रस्ते, गटारे साफ करतात. हा त्यांच्या कर्माचाच एक भाग म्हणावा लागेल.

आता सत्कर्म वा दु:कर्म म्हणजे काय? ते आपापल्या नजरेच्या सापेक्षतेवर अवलंबून असते असे म्हणावे लागेल. रामायणात वाल्या कोळी जंगलात वाटसरूंना लुबाडून वा प्रसंगी मारून आईवडिलांची व पत्नीची गुजराण करत असे. त्याच्या दृष्टीने ते त्याचे नियतकर्म होते. पण नारदांनी त्याला उचित उपदेश केल्यावर त्याला पश्चाताप झाला व नंतर कठोर उपासनेने या वाल्या कोळ्याचे महात्मा वाल्मिकीत रूपांतर झाले.

माझ्या मते या कर्माचे तीन मुख्य प्रकार आहेत. १) सात्विक कर्म, २) राजस कर्म, ३) तामस कर्म. जे कर्म कोणत्याही फलाची अपेक्षा न करता केले जाते ते सात्विक कर्म होय. बऱ्याचदा मानव देवावर विश्वास ठेवून व्रतवैकल्ये, उपासतापास करतो. तो केवळ आपली श्रद्धा देवाचरणी अर्पण करतो. आपल्यासारखी बरीचशी सामान्य माणसेही नियमितपणे देवळात जातात. देवाच्या चरणापाशी लीन होताना आपल्या मनात देवाकडे काहीही मागणी नसते. हे सात्विक कर्म होय. या जगात बरेच लोक गोरगरीबाला निरपेक्ष भावनेने मदत करतात. हे सात्विक कर्म होय. तर राजस कर्म काहीतरी मोबदल्याच्या अपेक्षेने केले जाते. मी तुला मदत करीन; पण त्या मोबदल्यात माझे हे काम कर. देवळातही एखादा विद्यार्थी देवाला पाव किलो पेढे वाटतो व नमस्कार करताना 'परीक्षेत मला चांगल्या गुणांनी उत्तीर्ण कर' असे विनवतो. हे राजस कर्म म्हणावे लागेल.

आता विषय असा उरतो की या जगात ही कर्मे कशी घडून येतात? याचे उत्तर कदाचित आपली ही नियतीच देऊ शकेल. काही वेळा एखादा सामान्य माणूसही या तामसकर्मात गुरफटला जातो व आपण असे का केले याचा ताळेबंद उकलत राहतो. काहीही असो, मला तर असे वाटते की आपण प्रत्येकाने आपल्या स्वत:वर विश्वास ठेवून शक्य तितके सत्कर्म करावे. त्यासाठी आपल्या कुलदेवतेची अथवा कुलदेवाची आराधना नियमितपणे करावी. वडीलधाऱ्यांचा आदर करावा. कुटुंबात एकीचे वातावरण निर्माण करावे. ज्या समाजात आपण रहातो त्या समाजाचे ऋण आपल्या सत्कर्माने चुकवावे. काहीही करून माझ्या हातून कोणतेही दु:कर्म न घडो अशी देवाला विनवणी करावी. याउपर आपली दैवगती आपल्याला कोठे वाहवत नेते ते त्या विधात्यावर सोडावे इतकेच सांगावेसे वाटते.

आता इतकेच सांगतो की, आपण सर्वजण आपल्या कर्माच्या बाबतीत जागरूक राहूया व येणाऱ्या भविष्यकाळात आपल्या हातून आपल्यालाच आपली लाज वाटेल असे दु:कर्म न घडो एवढी माफक काळजी प्रत्येकाने घ्यावी असे म्हणावेसे वाटते.

(सदर समाप्त)

स्मरणरंजन

# वाळवण

-विश्वास अजिंक्य

उन्हाळा हा आपणास त्रासदायक वाटत असला, तरी खाद्यसंस्कृतीत त्याची मदत मोठी आहे. वाळवणाचे पदार्थ बनवून त्याची बेगमी करणाऱ्या ललनांची लगबग हे उन्हाळ्याचे वैशिष्ट्य. कुरकुरीत कुरड्या, पापड, सांडगे, लज्जतदार मसाले, लोणची, मुरांबे हे सर्व पदार्थ त्याकाळात डबाबंद किंवा बरणीबंद होत असतात. वाळवण संस्कृतीत वैविध्य आहे. प्रांताप्रांतानुसार ते पदार्थ बदलतात. खाद्यपदार्थांची बेगमी करण्याची पद्धत आपण आदिमानवापासून शिकलो. तो शिकार करून आणलेल्या प्राण्यांचे मांस उरले, की ते वाळवून पुढे, गरजेच्यावेळी खाता येते हे अनुभवाने शिकला. पुढे त्याला मिठाचे गुणधर्म लक्षात आल्यावर तो पदार्थ खारवू लागला. तसेच तेल, साखर, मीठ, लवंग, मोहरी, काळे मिरी, या सर्वांचा वापर पदार्थ संरक्षित ठेवण्यासाठी व त्याची चव वाढविण्यासाठीदेखील करू लागला. कुरड्या, पापड, सांडगे, सांडगी मिरच्या हे पदार्थ आता घरी करण्याची आवश्यकता राहिली नाही. कारण हे पदार्थ केव्हाही दुकानात विकत मिळतात. घरगुती टच हवा असेल तर अनेक गृहिणी ते घरगुती स्वरूपात बनवून देतात. पदार्थ बनविण्याचे कामही आता सोपे झाले आहे. कुरड्यांसाठी चीक काढून देणाऱ्या गिरण्या आहेत. पापडाचे सर्व साहित्य तयार मिळते. जुन्या काळात ती कामे कष्टाची होती. वर्षभर येणाऱ्या सणावारांसाठी जे तळण लागायचं ते सगळं करून साठवण्याचं काम मे महिन्यातच केलं जायचं. याचं एक महत्त्वाचे कारण म्हणजे इतकं कडक ऊन मे महिन्याव्यतिरिक्त मिळत नाही. आणि दुसरं म्हणजे मुलांच्या शाळांनाही सुट्टी असते. त्यामुळे घरातल्या महिलांना जरासा मोकळा वेळ असतो.

वाळवणाचे पदार्थ करणं म्हणजे एकट्या-दुकट्याचे काम नाही. हे वाळवण सामुहिकरीत्या केलं जायचं. म्हणजे चार-पाच जणी मिळून रोज एक-दोन पदार्थ एकत्र करायच्या. पुरुष मंडळी ऑफिसला गेल्यावर नि परत येण्यापूर्वी ती ॲक्टीव्हिटी पूर्ण होत असे. घरातील सर्वात बुजूर्ग महिलेची महत्त्वाची भूमिका असायची. आजीबाईंचे काम सुपरव्हिजन करण्याचे. तिच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या वयाच्या गृहिणीने प्रमाण घ्यायचे व इतर तयारी करायची. जाणत्या मुली व नव्याने संसाराला लागलेल्या यांची भूमिका ट्रेनींची असायची आणि हे- ते हाताशी आणून देण्याची. एखादीच्या हातचा गुण असा असतो, की तिखट-मिठाचा अंदाज किंवा पीठ मळण्याची जबाबदारीची कामे तिच्यावर सोपवली जात.

(क्रमश:)

# A Song from My heart

-Dr. Sonali Nagpure

(डॉ. सोनाली नागपुरे यांचा हा लेख दिवाळी अंकात छापला गेला नाही. दिलगीर आहोत. -संपादक)

A few months ago, I hadn't imagined this situation. No one had. Now that I think of it, it hasn't been so bad. This 'me' time has actually been quite useful.

I remember, in the beginning, when the lockdown was announced, I was terrified. Mainly because it meant no house help. I was already juggling so many things, being a doctor and trying to fit in my singing in between. Now it meant doing all the housework as well.

The first week was tough. All I did was to cook and clean. But I knew something was missing. I couldn't keep doing just this. I couldn't just stop singing. After all, I had been learning classical music since I was a child and knew the importance of riyaaz.

Till now I would always meet my family regularly and sing to them any new songs I'd learnt. But now that that wasn't possible, one day I sang a song, recorded it on my phone and sent it to my mother, brother and husband. They loved it. I had never recorded any of my songs before, so this was a new experience.

As I got thinking, I remembered songs I used to sing as a child and had forgotten. Now some songs I had been too scared to attempt as they were very difficult. Now I tried singing them and I could, because I had time to work on them as there were no outdoor distractions. I learnt some new songs, tried different genres, from classical to Natyasangeet, Bhavgeet, Bhajans. And it was an amazing learning experience. Whenever I sang, I sang from my heart, song that I liked, felt connected to.

I recorded whatever I sang and started sharing with some more people who I thought would be interested. I had never done this before as I am quite a private person, but the love and appreciation I got for my songs, it felt very nice. Someone said I like to start my day with your song, while someone wrote I listen to your song every night before I sleep. When they said they had tears in their eyes after listening to an emotional song, what more could I ask for. If I could just give a movement of happiness of anyone, I feel my singing has been meaningful.

And with all this, I am managing all the housework and my patient really well. I have lost weight and have gone back to what I was doing and feeling like 20 years back. Except that I am wiser now. I can appreciate every minute of my life, the fact that I am alive and healthy, that my family is safe. And I feel more fresh than ever. This has indeed been a most memorable musical journey for me.S

## प्रतिक्रिया :

✶ अभिनंदन! 'प्रभुतरुण'ने दिवाळीचा उत्तम कार्यक्रम यू ट्यूबवर सादर केला. पहिल्या प्रथमच ज्ञातीतून असा कार्यक्रम सादर करण्यात आला. मोनिकाने सूत्रसंचालन छान केले. 'हॅटस् ऑफ टू सुहासिनी, संजना आणि तिचे सर्व तरुण सहकारी. आगे बढो!

-वृंदा जयकर

✶ मुखपृष्ठाची प्रशंसा करणारे असंख्य फोन आले. ऑनलाईन गाण्याच्या कार्यक्रमाविषयी खूप जणांनी सकारात्मक आणि आनंद वाढवणारी प्रतिक्रिया फोनवरून देऊन आमची उमेद वाढविली. (ठळक नाव घ्यायचे तर - श्री. अजित विजयकर यांनी एकूण अंकाबद्दल समाधान व्यक्त करून अभिनंदन केले. त्यांना आवडले ते संपादकीय आणि नलिनी तळपदे यांची 'राजकमल' नावाने प्रसिद्ध झालेली कविता. श्री. कुंदन आगासकर यांनी ऑनलाईन गाण्याच्या कार्यक्रमाबद्दल अभिनंदन केले. सौ. सुरुची प्रधान यादेखील फोनवर संवाद साधत्या झाल्या. जगदीश कीर्तिकरांवरील आदरांजली त्यांना खोलवर स्पर्श करून गेली. या आदरांजलीबद्दलची प्रतिक्रिया श्री. दीपक धैर्यवान यांनीही लेखी कळवली. ती अशी-

'श्रीमती सुहासिनी कीर्तिकर, संपादक- प्रभुतरुण,

प्रभुतरुणाचा दीपावली विशेषांक दीपावलीच्या आधीच मिळाल्याने सणाचा आनंद अधिकच गोड झाला. आपल्या एका लेखातून आपण आपले दोघे दीर श्री. रवी आणि श्री. जगदीश गजानन कीर्तिकर ह्यांना वाहिलेली आदरांजली म्हणजे व्यक्तिचित्रणाचा एक सुरेख नमुनाच. श्री. रवींशी माझा परिचय तसा जुजबीच. परंतु श्री. जगदीश म्हणजेच जगदीशभावोजींशी माझा चांगला परिचय असल्याने मला त्यांची छान माहिती होती. तरीदेखील आपल्या ह्या लेखामुळे मला त्यांच्या व्यक्तिमत्वाचे काही पैलू नव्याने समजले. कन्यादानाबद्दलच्या त्यांच्या मतातून त्यांची तत्त्वनिष्ठा आणि वैचारिक उंची प्रकर्षाने जाणवते. तत्त्वाचा बंदा जीव! लेखातील आपल्या प्रत्येक शब्दातून आपली त्यांच्याविषयीची आदराची, आपुलकीची आणि कृतज्ञतेची व्यक्त होणारी भावना मनाला विलक्षण स्पर्शून गेली. ह्या आदरांजलीबद्दल आपले अभिनंदन! दुसरी गोष्ट म्हणजे माझा ह्या दीपावली अंकातील सहभाग तसा अल्पच. परंतु त्याची नोंद घेण्याचा जो मनाचा मोठेपण आपण दाखवलात; त्याबद्दल मी व्यक्तिशः आपले व समस्त प्रभुतरुण विश्वस्त मंडळाचे मन:पूर्वक आभार मानतो.

**-दीपक माधव धैर्यवान**

✳

जागेअभावी अचला देसाई आणि रसिक विजयकर यांचे लेख जाऊ या अंकात येऊ शकले नाहीत

-संपादक

## अभिनंदन

✶ प्रथिशा कोठारे यांनी त्यांचे कविता आणि कथांचे पुस्तक ॲमेझॉन इंडिया आणि ॲमेझॉन यू ए वर प्रकाशित केले. या पुस्तकातून मिळणारा निधी त्या चालवीत असलेल्या केनियातील शाळाशिक्षकांना देणगी म्हणून देणार आहेत.

## बालविभाग

# दिवाळी आली

**-सिमरन आशिष देसाई**

आली आली दिवाळी आली
सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद घेऊन आली

घरी दिव्यांची रांग
कंदीलाचा मान
रांगोळी साजेसी
दारावर तोरण छान

आली आली दिवाळी आली
सर्वांचा उत्साह वाढवत

गोडधोड करीत आजी दिसते
आईची मदत होते
फराळाची चंगळ नुसती
मजा करीत मोठे छोटे

आली आली दिवाळी आली
प्रेम आणि आपुलकी घेऊन

हातात हात घेऊन सारे
दिव्याच्या ह्या सणाला
मिटवून द्वेष एकोप्याने
मोकळे करू मनाला

जुनी नाती, तोच गोडवा
नव्या नात्यांना जोडीत
एका स्वरात येई आवाज...

आली आली दिवाळी आली
रंग अनेक, पण चित्रं एक घेऊन

✳

# I'm Bored!!!

**-Aaraha Ajinkya**

When all games are played,
and all toys are done.
When all books are read,
and nothing seems fun.

Then comes a moment,
when I don't know what to do.
Gazing out the window,
seems boring too.

I lay on my bed,
staring at the ceiling.
thinking being bored,
is not the best feeling.

In a second, In a flash,
It occurred in my head.
I had a eureka moment,
laying in my bed.

Someone must have created,
those books, games and toys.
They must have been bored like me,
bored girls and bored boys.

Yippee!!! Woohoo!!!
Now I know what to do!!!
I'll write my own books,
and make toys and games too.

I think they are right,
Those people, when they say –
"Boredom leads to creativity,
it makes you find a way."

✳

# Mother Earth

**-Miss Aashvi Saurabh Dharadhar**

(VII std.)

Lets save our mother Earth
and not wait till the trees are in dearth
Mother Earth is in danger
Let's be her changer
Let us stop the usage of plastic
As Earth finds it's damage very drastic
Let's stop this dresdful pollution
And take s step towards green revoulution
Let's not just take from Earth our mother
And not just leave her to suffer
Mother Earth must think us mean
So its time to make her green and clean

# Feedback-

**Vinod Pradhan**- Congratulations. you have brought Pathare Prabhus from all over the world together. The programme also was good.

**Dr. Pradeep Vijayakar** -Awesome! Congratulations!Fantastic job by the Prabhu Tarun Team!Professionally Organized without any interruptions or glitches!Hats off to the ever enthusiastic Sanjana and her team!Really enjoyed it!DIL MANGE MORE!

**Deepashry Sudeep Kothare** - Innovative concept! Hard toil behind the curtains! Lively anchoring! Fun participation! Lockdown enabled us all to meet countless PP's here n across the seas! Looking forward to the next! Wishing all a happier festive time, now n always!

**Archana Dhurandhar** - Hi the karaoke event was very nice n entertaining . You are the sun of the universe . You put in so much efforts to get everyone together and spread cheer keeping the festive fervour and Pathare Prabhu culture alive . Really appreciate you . Also u looked lovely yesterday and you spoke so well . You yourself are a Diya that lights up the surrounding wherever u go. God Bless.

**Pratik Ajinkya** - Sanjana, I sincerely hope u stick to the format u guys have followed . MUSIC has no language and the fact that we had songs that appealed to one and all, be it Marathi , English or Hindi ...it all sounded so beautiful. My wife is a non Maharashtrian and I am sure there were many others too specially in different countries who could ideally follow this only because English was a common platform. As a matter of fact the link to this event has got shared even with NON PPs like my inlaws and friends who are equally enjoying seeing it . Didi also loved it and shared with her kids and husband (all of them dont follow Marathi ) , As a matter of fact she wants her daughter to participate too next time as language was not a limitation. I am sure that the viewership that the event got has been phenomenal through each and every part of the world where 1 link is a PP and thats the best way to spread awareness about our culture.

**Monica Deshpande** - An excellent event superbly organised and beautifully compered!! Hats off to the entire team.

**Nalanda Gorakhshakar** - Awesome program done yesterday... Kudos to full team... Sanjana.. Looking forward for such beautiful programs and would love to be part of it . Monica was soo good as MC

**Pooja Navalkar** - Beautiful...very well organised programme.Khoop majja aali... All of us were sitting and watching on TV. Hosted from USA....that was excellent... Hats off to the entire team....

**Sameera Navalkar** - Awesome job PT team!!! Hats off to the concept n execution.

**Sameer Vijayakar** - It was pleasure watching the event. Nicely anchored . Congrats to you and the team for a great event. Looking forward to more. My special regard to all participants for their enthusiasm and skills.

**Ronica Vijayakar** - I would like to take this opportunity to thank all the technical team members for putting up a brilliant show. It was a flawless program with commentary efficiently conducted by Monica . The introduction of songs too was seamlessly done. There were no snags, glitches or any other interruptions. Amrita s (Sanjana) enthusiasm is infectious and this is one Infection which I think everyone will welcome. Once again take a bow all of you. You deserve all the accolades rightfully showered on you.

**Kiran Kothare** : प्रभु तरुणने सादर केलेल्या कार्यक्रमाचं खरोखरच कौतुक करायला हवं. एक गोष्ट मात्र नेहमीच खटकते. मराठी भाषिकांच्या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन इंग्रजी भाषेत का? (गाणी हिंदी होती ना? -संपादक)

**Ashwini Suriya** - Hi Sanjana, Congratulations for putting up a super successful show. Remarkable effort by you and your team. Well deserved applaud Looking fwd for the next one.

**Pavan Kirtikar** - Fantastic programme organized by Tarun- Karoike night on the occasion of Diwali. Superb.

**Yogesh Rao** - अभिनंदन!अभिनंदन!अभिनंदन!

कराओके नाईटच्या यशाबद्दल सर्व टीमचे त्रिवारअभिनंदन. करोनाच्या पार्श्वभूमीवर आपण हा कार्यक्रम आयोजित करून लोकांमध्ये आलेली मरगळ दूर करण्यात यशस्वी झालात. हा कार्यक्रम जणू सर्वांना एक नवी संजीवनी होती. हा कार्यक्रम पहाताना वेळेचे भान राहिले नाही. ७ वाजता सुरु झालेला कार्यक्रम १०.३० कधी वाजले समजलं नाही.

खास शाबासकी टेक्निकल टीमला. अप्रतिम आयोजन. कुठेही तांत्रिक बाबीमुळे अडथळा नाही. एकदम स्मूथ फ्लो होता.

ह्या कार्यक्रमाच्या यशानंतर पुढील कार्यक्रमासाठी सर्वांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. अर्थात आपली टीम हे शिवधनुष्य पेलण्यास समर्थ आहे.

पुन्हा एकदा मिळालेल्या यशाबद्दल त्रिवार अभिनंदन आणि पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

**Varsha Nayak** -We enjoyed the Prabhu Tarun Karaoke Night. You people have done a wonderful job on it.

**Rakhee Navalkar** - Great job by the entire Prabhu Tarun team very well organised first ever online show n congratulations to all the participants. looking forward for many more shows . great job by compere Monica n Sanjana n technical team .

**Ujwal Dhurandhar** -Excellent management for the event Sanjana. All the best for your future events.

**Kavita Kirtikar** -Flawless event. Great effort by the team and excellent performance by all participants. Thoroughly enjoyed.

**Sunila Dhairyawan** - Appreciate you n your team to organised such a lovely programme during pandemic.

**Raj Ajinkya** - Sanjana, I was happy that this turned out to be mostly in English because our son in law Ben, who is a big fan of our music , could enjoy it along with us. Thanks so much once again.

**Sunil Jayakar** - Yesterday's event was a tremendous success. Something, we all experienced for the first time ( time/ circumstances prevailed).Participation by so many " Taruns " at first experiment was awesome. It was good thinking of not having competition. Just singing by children to aajoba/ aajis was only entertainment and encouraging. My wholehearted congratulations to your team. Not to forget Chhona's daughter anchoring by sitting in US. She's stepping in Chhona's shoes. I'm proud of you Taruns. Three cheers for houshi PP youngsters, hip hip hurrays!

**Asavari Desai** - Lovely program Sanjana, Monica, Pranav and entire team executing it. Enjoyed the evening.

**Shreya Talpade** - Khup chan zala kaalcha karyakram. Ayojan changle kelele.

**Aishwarya Navalkar** - Too good had a nice evening really enjoyed the show,g8 efforts by all the Prabhu Tarun team members

**Lalan Kirtikar** - Sanjana, programme was toooo good.
It was amazing, awesome , super-duper hit programme.
All participants were good but Ashwini kothare song took the graph so high that we cant even think. Heartiest congratulations to Prabhu Tarun team.

**Shailendra Talpade** - Excellent show organised, 3.5 hrs of full entertainment...kudos to you & entire PT team for giving such a wonderful event..best of luck for next event...3 cheers!!!

**Gaurang Kirtikar** - Sanjana, congrats to you and the team for staging such a wonderful show. A tremendous success. Keep up the good work. Well certainly celebrate the century in style. Thanks for everything.

**Ninad Dhairyawan** - AWESOME< þ it's the only word to describe this maiden effort. Looking forward to the next edition in which I hope to Participate.

**Anil Rao** - Today's programme was a perfect substitute for Houshi Kala programme conducted each year during Diwali.Well done! Such programs be held regularly at the time of our various fastivals like Gudi Padva, Hindhu New Year, Kojagari etc etc All the best for future.

**Manila Rao** - Well done Sanjana. Good Idea. Taken forth by your team. Looking forward to January 17th

**Vrinda Jayakar** - Congratulations. Superb program is arranged by Prabhu Tarun. Hats off to you Sanjana, Monika, Dnanda and Sunil Pawar. Go ahead.

**Anjali Talpade** - Wonderful initiative.. Hat's off to all of you.." Show must go on Spirit...

✳

## प्रतिक्रिया दिवाळी अंकाविषयीच्या

✶ सौ. अचला देसाई यांचा लेख यथोचित शब्दात व्यक्त झाला आहे. मुख्य म्हणजे आशादायी चित्र त्यात आहे. आभा देसाईच्या कथेतील कल्पना अभिनव आणि छान आहे आणि ती तिने अतिशय छान सादर केलीय.

**-नीला कोठारे**

✶ मृदुला जोशी यांना - 'तुमचा 'प्रभुतरुण' दिवाळी अंकातील लेख अतिशय हृद्य झाला आहे. क्षणभर मी त्या रंगभवनात जाऊन संगीतात इतकी रंगून गेले की अजून त्याचे गारूड मनावरून उतरले नाही. धन्यवाद!

**-वृंदा जयकर**

✶ मृदुला जोशी यांना - 'तुमचा लेख अप्रतिम आहे. लता मंगेशकरांचा किंचित का होईना; तुम्हाला उचित सहवास लाभला. आनंद झाला आणि (चांगल्या अर्थाने) हेवा वाटला. अभिनंदन.'

**-दीपक धैर्यवान**

✶ Mrs. Suhasini Kirtikar, Prabhu Tarun, While wishing you happy Diwali, my wife Praneeta joins me in expressing deep sense of appreciation for 1st online event of musical night, eagerly witnessed by my family including my grandchildren Arnav and Arjit.

A word of appriciation for compering by Monica Rane-Iyer.

Again Kudos for Diwali isue received before Diwali with appropriate cover page depicting `Dhandive' of Pathare Prabhus.

regard,

**- Arvind Dharadhar**
Octogenarian Pathare Prabhu

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### नारळ साखर दिला

२५-१०-२० श्री. चिंतामणी मकरंद कीर्तिकर, कु. नेहा मुकेश वाझकर
२५-१०-२० कु. करिष्मा राजेश नवलकर, श्री. अमीश भारत मारू (आं. ज्ञा.)

### विवाह सुवर्ण महोत्सव

३०-११-२० श्री. अजित मोरोबा विजयकर, कु. नेत्रा शंकरराव वेलकर

### विवाह रौप्य महोत्सव

२४-११-२० श्री. कौशिक सुभाष जयकर, कु. मीनाक्षी योगेश आगासकर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १५-१०-२० | श्रीम. स्मिता नागेश आनंदराव तळपदे | वय ८१, | बोरीवली |
| १६-१०-२० | श्रीम. मधु वसंत धुरंधर | वय ७७, | विरार |
| १७-१०-२० | श्रीम. शुभ्रकांता आनंदराव राणे | वय ९१, | सांताक्रूझ |
| १९-१०-२० | श्रीम. वंदना नवकुमार धुरंधर | वय ७७, | सायन |
| १९-१०-२० | श्री. सुभाष विश्वासराव कीर्तिकर | वय ८७, | अंधेरी |
| २२-१०-२० | श्री. मधुकर मोतीराम तळपदे | वय ८८, | अंधेरी |
| २६-१०-२० | श्री. सुरेंद्र गजानन विजयकर | वय ७९, | प्रभादेवी |
| २८-१०-२० | श्री. शिवनंदन रामराव राव | वय ८९, | ठाणे (प.) |
| २८-१०-२० | श्रीम. कालिंदी गोपाळ राणे | वय ९०, | ठाणे |
| २९-१०-२० | श्रीम. निर्मला सुशील कोठारे | वय ७५, | खार |
| ३१-१०-२० | श्रीम. संध्या विलास धुरंधर | वय ७५, | बोरीवली |
| ०८-११-२० | श्रीम. विजया पांडुरंग धैर्यवान | वय ९०, | लिंकिंग रोड |
| १०-११-२० | श्रीम. माधुरी सुरेश राव | वय ७३, | खार |
| १५-११-२० | श्री. आशुतोष राजेंद्र नवलकर | वय ५०, | सांताक्रूझ |
| २०-११-२० | श्रीम. सीना किशोर कोठारे | वय ८०, | अंधेरी |
| २२-११-२० | श्री. राजेंद्र रवींद्र नवलकर | वय ७२, | कांदिवली |
| २३-११-२० | श्रीम. सुधा (डॉली) रवींद्र नवलकर | वय ८४, | ग्रँट रोड |
| २४-११-२० | श्रीम. प्रमिला केदार आगासकर | वय ७३, | नालासोपारा |
| २७-११-२० | श्रीम. सीनल (पद्मा) विष्णू जयकर | वय ९२, | खार |

### चुकीची दुरुस्ती आणि दिलगिरी

* दिवाळी अंकातील उज्ज्वला ब्रह्मांडकर यांच्या श्रद्धांजलीत नाव उज्ज्वला रवींद्र ब्रह्मांडकर असे कृपया वाचावे.
* सप्टेंबरमधील अंकात प्रणिता प्रभाकर यांच्या लेखाचे शीर्षक वाचताना 'अस्वस्थतेचे' असे वाचावे. ते अनवधानाने 'अवस्थेचे' झाले आहे.
* दिवाळी अंकातील 'सावली' कविता हेमंत तळपदेंची नाही. ती त्यांच्या नावावर छापली गेली आहे. तसेच त्यांच्या कवितेतील 'शत्रुचिंतक' शब्दाऐवजी 'शुभचिंतक' असे कृपया वाचावे.
* जय रोहन कोठारे हे मेकॅनिकल इंजिनियर झाले असे वाचावे.

## प्रभुतरुणास देणगी

★ सौ. नेत्रा आणि श्री. अजित मोरोबा विजयकर यांजकडून त्यांच्या विवाहाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त रु. २१,०००/-

★ श्री. अनिल रवींद्र तळपदे यांजकडून दिवाळीनिमित्ताने रु. २,५०१/-

★ सौ. भारती आणि श्री. रसिक कृष्णराव विजयकरकडून 'प्रभुतरुण' दिवाळी अंकासाठी रु. २,०००/-

★ रश्मी प्रमोद जयकर यांजकडून भाऊबीज रु. २,०००/-

★ मनेका जे तळपदे यांजकडून भाऊबीज रु. २,०००/-

★ विजय प्रधान यांजकडून भाऊबीज रु. १,००१/-

★ श्री. विहान आणि कु. नीश्का यांजकडून प्रभुतरुणास भाऊबीज रु. १,०००/-

★ आजीव सदस्यत्व श्री. अक्षय अंजन कोठारे रु. ५००/-

★ आजीव सदस्यत्व सौ. ऋता मेघनाथ हजरनीस रु. ५००/-

★ आजीव सदस्यत्व गुणवंत बी. धैर्यवान रु. ५००/-

सर्वांचे मन:पूर्वक आभार.

### प्रतिक्रिया दिवाळी अंकाविषयीच्या

★ प्रभुतरुण इंग्लिश-मराठी दिवाळी अंक नेहमीसारखा वाचनीय आहे. डॉ. सुमन नवलकर (कथा, वात्रटिका), सुहासिनी कीर्तिकर (कथा), दीपक धैर्यवान (पर्यटन), त्वरिता देसाई (व्यक्तिचित्र) विशेष उल्लेखनीय! मराठी आणि इंग्लिश लेखांची सरमिसळ कशाला? दोन्ही भाषांचे वेगवेगळे विभाग करायला हवे होते! कारण दोन्ही भाषेतील लेख पन्नास टक्के आहेत.

**-रसिक विजयकर**

★ सुहासिनी, आत्ता पाच मिनिटापूर्वी मी सुरेखाच्या घरून दिवाळी अंकाच्या दोन प्रती घेतल्या. फारच सुंदर काढला आहेस गं अंक. मुखपृष्ठ तर अप्रतिम सुंदर आहे. अंक हातात घेतल्या-बरोबर 'वाह' अशी दाद गेली. साहित्य तर जबरदस्त दिले आहेस. तासाभरात मी तुझा संपूर्ण अंक एका संपादकाच्या नजरेने चाळून काढला. काही लेख तर वाचूनसुद्धा काढले. संपूर्ण अंक अप्रतिम झाला आहे. तू किती परिश्रम घेतले असशील त्याची कल्पनाही करता येत नाही. पुन्हा एकदा मनापासून तुझं अभिनंदन करते.

**-मृदुला प्रभुराम जोशी**

★ Got our Prabhu Tarun Diwali anka copy yesterday. Since then, Radhika has been on cloud 9.

Thank you so much for indulging her and giving her a page with coloured pictures.

**-Shubhada S. Agaskar**

### अभिनंदन

★ डॉ. अमित चंद्रशेखर धैर्यवान हे करोना योद्धा बनून रुग्णांची सेवा करीत आहेत.

★ आकाशवाणीवरील 'आरोग्यम् धनसंपदा'मध्ये डॉ. प्रिती जयकर यांचे सलग पाच दिवस मार्गदर्शनपर भाषण झाले.

★ डॉ. सुमन नवलकर यांचे ऑनलाईन कविता सादरीकरण आणि कथाकथन जे. के. मीडियातर्फे झाले. त्याचप्रमाणे 'ज्योती' या ऑनलाईन बाल दिवाळी अंकात त्यांनी विनोदी कथा सादर केली. अनेक दिवाळी अंकात त्यांचे साहित्य योगदान आहे.

★ सौ. स्मिता मोहन जयकर यांचे 'अभिनय ते अध्यात्म' या प्रवासावर आधारित ३०-१०-२० रोजी 'प्रारंभ कला अकादमी' तर्फे महिला महोत्सवात ऑनलाईन व्याख्यान झाले.

## परीक्षेतील सुयश

**एम्‌एफ्‌एम्‌ (मास्टर इन फिनान्शियल मॅनेजमेंट) वेलिंगकर इन्स्टिट्यूट, मुंबई विद्यापीठ**

श्री. चिन्मय विजीत धुरंधर, ९१.२% (CGPA 9-6)

**बी.ई. (कॉम्प्युटर इंजिनियरींग, मुंबई विद्यापीठ)**

श्री. अमेय निकोलाय कीर्तिकर

**बीएम्‌एम्‌ (मुंबई विद्यापीठ)**

कु. नेहा मिलिंद वाघ (डॉ. आश्विनी वाघ यांची मुलगी) मुंबई विद्यापीठातून दुसरी आणि नॅशनल कॉलेजमधून पहिली आली.

✳

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67